UE 6 | NOV.-DEC. 2018

ISSN: 2454-5503

# HRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal



*Chief Editor*

**Dr Kalyan Gangarde**

13.

# महाराष्ट्रातील कृषी आधारित उद्योग

**डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर जि. नांदेड

वना : महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात कृषिआधारित अनन्यसाधारण असे महत्व आहे.. राज्यातील औद्योगिक ढ्याने .होत असतानादेखील शेतीवर अवलंबून ची संख्या मात्र कमी होताना दिसत नाही. वाढत्या चा शेतीवर पडणारा ताण, शेतीमध्ये असलेली सुप्त वाढत आहे.. त्यावर आळा घालण्यासाठी कृषिआधारित त्वाचे ठरतात. ग्रामीण भागात शेतीवर आधारित उद्योग ल्यास ग्रामीण.भागातील लोकांना उपजीविकेसाठी रोजगाराचे लब्ध होईल. त्यामुळे रोजगारानिमित्त शहराकडे धाव घेणाऱ्या माण कमी होईल. म्हणूनच स्थलांतराला आळा घालण्यासाठी द्योगाची गरज असते. तसेच प्रादेशिक विषमता कमी ठी उद्योगाचे विकेंद्रीकरण होण्यासाठी, असलेल्या नांचा सदुपयोग करणे आणि सामाजिक, आर्थिक व क परिवर्तनाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी कृषी आधारित ना अनन्यसाधारण असे महत्व आहे. म्हणून राज्यातील शेती शेतीवर आधारित उद्योग यांची योग्य प्रकारे सांगड घातल्यास राज्यातील अर्थव्यवस्थेसाठी भरपूर फायदा होतो.

सर्वसाधारणपणे, शेतीच्या उत्पादनावर प्रक्रिया करुन विविध उत्पादन करणाऱ्या उद्योगांना कृषी आधारित उद्योग असे नाते किंवा शेतीला शेतीविषयक अदानाचा पुरवठा करतात असे म्हणजे कृषी उद्योग होय. फॅमीन इक्क्वायरी कमिशनच्या मते, उद्योग शेतीमालावर प्रक्रिया करतात व राज्याच्या णिकीकरणात मदत करतात आणि शेतीला शेतीविषयक चा पुरवठा करतात असे उद्योग म्हणजे कृषी उद्योग होय." दि कौन्सिल ऑफ अप्लाईड इकोनोमिक्स रिसर्चच्या मते, मालावर प्रक्रिया करणारे व शेतीसाठी लागणारी अवजारे, खते, याणे, कीटकनाशके इत्यादी निर्माण करणाऱ्या उद्योगांना कृषी म्हटले जाते"

महाराष्ट्रात कृषी मालावर आधारित उद्योग मोठ्या प्रमाणावर झाले असुन काही उद्योग खजगी व काही सहकारी क्षेत्रात त. पुरतुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील काही महत्वाच्या कृषि त उद्योगाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**साखर उद्योग** :- साखर उद्योग हा शेतीमालावर आधारित असा महाराष्ट्रातील एक महत्वाचा उद्योग आहे. सन 1919 मध्ये महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यात श्रीरामपूरजवळ हरेगाव येथे 'दि बेलापूर शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज' हा खाजगी क्षेत्रात सुरु झाला. त्यानंतर त्याच जिल्ह्यात लोणी बुद्रुक (आता प्रवरानगर) येथे 1949 मध्ये महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपुर्ण भारतातील सहकारी तत्वांवरील पहिला साखर कारखाना श्री विखे पाटील यांनी उभारला. पुढील काळात महाराष्ट्रातील साखर उद्योगाने त्यातही सहकारी तत्वावरील साखर उद्योगाने पुन्हा मागे वळून पाहिले नाही. मार्च 2017 अखेर राज्यात 179 नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने होते. त्यापैकी 99 साखर कारखाने उत्पादन चालू असलेले होते. राज्याच्या ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यात साखर उद्योगाने महत्वाची भूमिका बजावली आहे.

महाराष्ट्रात साखर कारखान्यातून साखरेशिवाय इतर दुय्यम उत्पादने मिळतात. उसाच्या चिपाडापासून कागदाचा लगदा व नंतर कागद बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. तसेच मळीपासुन अल्कोहल व दारु तयार करता येते. राज्यात सहकारी व खाजगी क्षेत्रात हे उद्योग कार्यरत आहेत.

2) **कापड उद्योग** :- भारतात सुती कापड उद्योगाच्या बाबतीत महाराष्ट्राचे स्थान महत्वपुर्ण आहे. सुती कापड हा महाराष्ट्रातील एक जुना उद्योग आहे. अनेक वर्षापुर्वी महाराष्ट्रात घरगुती उद्योगाच्या स्वरुपात हा उद्योग अस्तित्वात होता. सन 1854 मध्ये कासवजी नानाभाई दावर यांनी मुंबई येथे पहिली आधुनिक कापड गिरणी स्थापन केल्यानंतर सुती कापड उद्योगाच्या विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. त्यानंतर अनेक कापड गिरण्या मुंबई येथे स्थापन झाल्या. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर कापड उद्योगाला गती मिळाली. आज राज्यात पश्चिम महाराष्ट्रात पुणे, भिवंडी, भोर, येवले, मालेगाव, नाशिक, इचलकरंजी, ~~मिरज~~, बार्शी येथे कापड उद्योगाची केंद्रे आहेत. मराठवाड्यात औरंगाबाद जालना व नांदेड, खानदेशात जळगाव, चाळीसगाव व अमळनेर येथे तर विदर्भात नागपुर, पूलगांव, हिंगणघाट, बडनेरा, अचलपुर, अकोला येथे कापड उद्योगाची केंद्रे आहेत, परंतु मुंबई हे महाराष्ट्रातील कापड उद्योगाचे सर्वात मोठे केंद्र आहे. राज्यातील जवळपास निम्या कापड गिरण्या एकट्या मुंबई शहरात आहेत. म्हणुन मुंबईला 'भारताचे मॅचेस्टर' असे म्हणतात.

कापड उद्योगामध्ये कापसापासून सरकी काढणे, कापसाचे जिनिंग व प्रेसिंग करुन त्यांच्या गाठी बांधणे, सूत काढणे, कापड तयार करणे यासारख्या उद्योगाचा समावेश होतो. राज्यात सुतगिरण्या खाजगी व सहकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आहेत. कापड गिरण्या मात्र खाजगी क्षेत्रातच आहेत. सुतगिरण्यामुळे राज्यातील लाखो लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे.

3) **डाळ व तेल गिरण्या** :- महाराष्ट्रात तूर, मूग, उडीद, चवळी, हरभरा, मसूर इत्यादी द्विदल धान्याचे उत्पादन होत असल्यामुळे डाळ गिरण्या सुरु झाल्या आहेत. या गिरण्या प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात बऱ्याच ठिकाणी आढळतात. तसेच राज्यात भुईमूग, सुर्यफुल, तीळ, जवस, करडी, एरंडी, आंबाडी इत्यादी तेलबियांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. या तेलबिया ाचे गाळप करुन त्यापासुन तेल काढण्याचे उद्योग राज्यात मोठ्या प्रमाणावर विकसित होऊ लागले आहेत. तेलबियापासून तेल काढण्याचे अनेक कारखाने खाजगी व सहकारी क्षेत्रात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात विशेषत: भुईमुगाच्या तेलापासुन वनस्पती तूप केले जाते. वनस्पती तुपाचे कारखाने विदर्भ, खांदेश, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात दिसून येतात.

4) **भात सडण्याचा गिरण्या** :- महाराष्ट्रात जास्त पावसाच्या तसेच जलसिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या प्रदेशात भाताचें पीक घेण्यात येते. विदर्भांच्या पूर्व भागात भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली आणि कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाताचे सर्वाधिक क्षेत्र असल्यामुळे या भागात भात सडण्याच्या गिरण्यांचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. याशिवाय महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे व नाशिक जिल्ह्यात या उद्योगाचा बराच विकास झालेला आढळून येतो.

5) **तंबाखू उद्योग** :- महाराष्ट्रात तंबाखूचे उत्पादन फारच कमी प्रमाणात होत असल्यामुळे तंबाखूवर आधारित उद्योगाची प्रगती राज्यात फारशी झालेली नाही. तंबाखूपासून जर्दा, तपकीर, विड्या, सिगारेट इत्यादीची निर्मिती केली जाते. विड्या तयार करण्याचा कुटीरउद्योग, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात चांगलाच विकसित झाला असून हा उद्योग कोल्हापूर, सातारा, पुणे, नाशिक, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, नागपूर इत्यादी भागात आढळतो. विडी उद्योगामुळे राज्यात ग्रामीण भागातील स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे. सातारा व पुणे जिल्ह्यातील शिरुळ येथे जर्दा तयार होतो तर कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर व हलकर्णी येथे तपकीर तयार केली जाते.

6) **रेशीम उत्पादन** :- रेशीम उत्पादन व्यवसाय हा कृषी-कुटीर उद्योग असून यामध्ये ग्रामीण भागात रोजगार निर्मितीबरोबरच शेतकऱ्याचे अतिरिक्त उत्पन्नाचे साधन बनण्याची क्षमता आहे. रेशीम उत्पादनात तुती व ऐन या वृक्षाची लागवड, रेशीम किड्याचे संगोपण, कोष व कच्चा रेशमाचे उत्पादन यांचा समावेश होतो. राज्यातील वातावरण हे रेशीम उद्योगास पूरक आहे. देशात अपारंपारिक पद्धतीने रेशीम उत्पादन करणाऱ्या राज्यामध्ये महाराष्ट्रात प्रथम स्थानावर आहे. राज्यात 25 जिल्ह्यामध्ये तुती रेशीम विकास कार्यक्रम राबविला जात असून विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या चार जिल्ह्यामध्ये टसर रेशीम विकास कार्यक्रम राबविला जात आह. राज्यात रेशीम उत्पादनातून मोठ्या प्रमाणात मनुष्य दिवस रोगाराची निर्मिती झाली आहे.

7) **फळप्रक्रिया उद्योग** :- फळावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागाच्या विकासाला हातभार लावतात. फळावर प्रक्रिया करुन लोणचे, आमरस, मुरंबे, जेली, जाम इत्यादीची निर्मिती करणारे अनेक लहान-लहान उद्योग ग्रामीण भागात सुरु करता येतात. महाराष्ट्रात आंबा, काजू, कोकम, अननस, नारळ, द्राक्षे, संत्री, केळी य अनेकविध फळाचे उत्पादन होत असल्यामुळे राज्यात फळाव करण्याचे उद्योग चालतात. रत्नागिरी येथे आंबे व अननसाव करणारे तसेच कोकमपासून शरबत तयार करण्याचे कारखाने मालवन व वेंगुर्ला येथे काजूवर प्रक्रिया करण्याचा, जळग केळीपासुन पावडर बनविण्याचा कारखाना, सांगली व नाशि द्राक्षापासून मनुके बनविण्याचा तर नागपूरला संत्र्याचा रस डब्यात भरण्याचा कारखाना आहे.

8) **इतर उद्योग** :- शेती संबंधित इतर अनेक उद्योग भागात असून त्यात दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी-मेंढी मधुमक्षिकापालन, मत्सोद्योग, नारळाच्या झाडापासुन काथ्या करणे, ताडाच्या झाडापासुन चट्या, पिशव्या तयार करणे, जंगल वृक्षापासुन डिंक गोळा करणे, वनस्पतीपासुन औषधी तयार क लाकडापासुन खेळणी व फर्निचर तयार करणे इत्यादी व्यवसा समावेश होतो. या व्यवसायामुळे ग्रामीण भागात रोजगार व लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. परिणामी उपभोगात वाढ हो राहणीमान सुधारते आणि ग्रामीण भागाचा चेहरा बदलण्यास मदत ह

**कृषी आधारीत उद्योगाचे ग्रामीण विकासातील स्थान :-**

महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात कृषी आधारीत उद्योग महत्व पुढील प्रमाणे सांगता येते.

1) **कृषी उद्योग, शेती व उद्योग यांच्यातील दुवा** :- कृषी उद्योग उद्योगाच्या विकासाला प्रेरणा देणारे असतात. या उद्योगामु ग्रामीण भागात असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा, श्र शक्तीचा उपयोग करता येतो. कृषी उद्योग ग्रामीण भागाती औद्योगिकीरणाला प्रेरणा देणारे असतात. शेतीच्या विकासामु ग्रामीण भागाचा विकास होतोच असे नाही. अर्थव्यवस्थेतील स विभागाची प्रगती म्हणजेच विकास.तेव्हा कृषी उद्यो अर्थव्यवस्थेचा सर्व क्षेत्राच्या विकासाला चालना देतात.

2) **शेतीला पुरक व्यवसाय** :- अनेक कृषी उद्योग शेतीला पूरक किंवा सहयभूत ठरतात. जसे शेतीला पूरक व्यवाय म्हणून दुग्ध व्यवसाय हा एक आहे. दुधापासून दुधाची भुकटी, लोणी, तूप, चक्का, पनीर यासारख्या वस्तू तयार करणारे उद्योग ग्रामीण भागात सुरु करता येतात. या उद्योगामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजागार प्राप्त होईल. परिणामी उत्पन्नात वाढ होईल.

3) **उत्पन्न व रोजगार संधीत वाढ** : वर नमुद केल्याप्रमाणे कृषी उद्योग शेतीला पूरक असल्याने या उद्योगाने ग्रामीण भागात रोजगारात वाढ केली आहे. रोजगारप्राप्तीमुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

**सारांश :**

राज्याच्या विकास प्रक्रियेत, विशेषत: ग्रामीण विकासाच्या संदर्भात कृषि उद्योगांची भुमिका अतिशय महत्वाची राहीली आहे. ग्रामीण भागात हे उद्योग सुरु होऊ शकतात. भांडवलाची कमतरता, संघटनाचा अभाव, कौशल्याचा अभाव, श्रमशक्तीचा ज्यादा पुरवठा इत्यादी घटकांमुळे आधुनिक मोठे उद्योग ग्रामीण भागात जाण्याबाबत उदासिन असतात. परंतु कृषि उद्योग मात्र हे अडथळे पार करुन विकसित होऊ शकतात. राज्यात जेथे कृषि उद्योग स्थापन झाले तेथे शेतीच्या लागवडीची जुनाट पद्धती जाऊन आधुनिकीकरणाची सुरुवात



Scanned with Oken Scanner

...येते. महाराष्ट्रातल्या साखर कारखान्यांच्या ...हेच दिसून येते की, निर्वाह शेतीचे रुपांतर व्यापारी ...व शेवटी ग्रामीण क्षेत्राचा विकास साधणे कृषि उद्योगांमुळे ...कृषि उद्योगांचा फायदा म्हणजे ते कच्चा मालाच्या उत्पादन ...(म्हणजे ग्रामीण भागात) सुरु केले जाउ शकतात. ...क्रिया, धान, ऊस इत्यादी पिकांवर प्रक्रिया करणारे उद्योग ...त सुरु करणे शक्य होते. जर असे उद्योग स्थापन झाले तर ...ला परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होतो. ग्रामीण क्षेत्रात ...संख्या प्रचंड आहे, शिवाय सुप्त बेकारीमुळे श्रमशक्तीचा ...तो. या श्रमीकांना खेड्यातुन शहरात पाठविणे हा खरा उपाय ...खेड्यांमध्येच रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकल्या तरच हा प्रश्न सुटू शकतो. कृषि उद्योगामुळे ग्रामीण बेकारीच्या समस्येचे गांभीर्य निश्चितपणे कमी होऊ शकते. वाढत्या औद्योगीकरणाबरोबर शहरीकरणात वाढ झाली आहे व त्यामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. खेड्यांतील बेकारांचा लोंढा शहराकडे धाव घेतो व खेड्यांचे अस्तीत्व धोक्यात येते. या प्रक्रियेमध्ये एका बाजूला खेड्यांचे विघटन आहे. पण शहरांची निकोप वाढ मात्र होत नाही. ग्रामीणांची शहरांकडील धाव अशीच सुरु राहिली तर खेड्यांच अस्तित्वाला धोका निर्माण होईल. कॉंक्रीटची जंगले वाढविणाऱ्या शहरांपेक्षा खेड्यांना स्वत:ची निश्चित प्रतिमा आहे व ती जपण्याचे आवश्यक काम कृषी उद्योग करु शकतात. कारण असे उद्योग स्थापन झाल्याने ग्रामीण जनतेला आपल्या मुळांपासून दुर जावे लागणार नाही.


1) R. P. Kacharu, Report of Agro Processing Industries in India, Growth Status and Prospectus
2) V. Vankaiah, Impact of Agro based industries on Rural Development, Himalaya Publication House, Delhi
3) S. K. Gupta, Development of Agro based industries, Problems, Prospectus, Deep & Deep publications, New Delhi
4) U. C. Patnaik / G. S. Achraya, Small Scale industries and industrial State program, Sonali Publication, New Delhi
5) V. S. Mahajan, Indian economy towards 2000 AD, Deep & Deep publications, New Delhi
6) डॉ. एस.ए. देशपांडे भारतीय नियोजन आणि आर्थीक विकास, विद्याप्रकाश नागपुर
7) रायखेलकर दामजी, औद्योगिक अर्थशास्त्र विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
8) डॉ. सुदामा सिंह, भारतीय अर्थव्यवस्था, समस्या एवं नितिया, राधा पब्लीकेशन, न्यु दिल्ली
9) माधव बिरादार, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्याबुक्स पब्लीकेशन, औरंगाबाद


❑❑❑



Scanned with Oken Scanner